सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

सन १९१८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६

# महाराष्ट्र परकीय इसमांच्या अपात्रतेबाबत अधिनियम.

(दिनांक २९ नोव्हेंबर, २०१२ पर्यंत सुधारित)

**BOMBAY ACT No. VI OF 1918**

# The Maharashtra Disqualification Of Aliens Act.

**(As modified upto the 29th November, 2012)**

व्यवस्थापक, येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-४११ ००६ यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित

२०१३

[ किंमत : ०.०० रुपये ]

S (J) 507

# महाराष्ट्र परकीय इसमांच्या अपात्रतेबाबत अधिनियम.

## अनुक्रमणिका

**प्रारंभिक.**


| **कलमे.** | | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १. | लघुसंज्ञा. | ... | १ |
| १-अ. | व्याप्ती. | ... | १ |
| २. | व्याख्या. | ... | १ |
| ३. | परकीय इसमाची अपात्रता. | ... | २ |
| ४. | नंतर अपात्र ठरविल्यामुळे होणारे परिणाम. | ... | २ |
| ५. | माफी. | ... | ३ |
| ६. | अनुसूचीतील फेरफार. | ... | ३ |
| | **अनुसूची** | | |

# सन १९१८ चा मुंबई अधिनियम ६.[१]

## [[२] महाराष्ट्र परकीय इसमांच्या अपात्रतेबाबत अधिनियम.]

**[१७ सप्टेंबर १९१८.]**

हा अधिनियम, सन १९२० चा अधिनियम, ३८ याअन्वये अंशत: निरसित करण्यात आला.

त्यात सन १९२० चा मुंबई ४ अन्वये सुधारणा करण्यात आली.

त्यात, भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश याअन्वये अनुकूलन व फेरबदल करण्यात आले.

विधि अनुकूलन आदेश, १९५० याअन्वये अनुकूलन व फेरबदल करण्यात आले.

मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६ याअन्वये अनुकूलन व फेरबदल करण्यात आले.

महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० या अन्वये अनुकूलन व फेरबदल करण्यात आले.

**विवक्षित परकीय इसमांस मुंबई इलाख्यांतील विवक्षित स्थानिक प्राधिकरणांचे सदस्य होण्यास, आणि त्यांच्या सदस्यांच्या निवडणुकीत मत देण्यास अपात्र ठरविण्याबाबत अधिनियम.**

**ज्याअर्थी,** मुंबई इलाख्यांतील विवक्षित स्थानिक प्राधिकरणांचे सदस्य होण्यास, आणि त्यांच्या सदस्यांच्या निवडणुकीत मत देण्यास, विवक्षित परकीय इसमांस अपात्र ठरविणे इष्ट आहे; त्याअर्थी, याअन्वये पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात आला आहे.--

**लघुसंज्ञा.** **१.** ह्या अधिनियमास, [ महाराष्ट्र परकीय इसमांच्या अपात्रतेबाबत अधिनियम ] असे म्हणावे.

**व्याप्ती.** [३][**१-अ.** हा अधिनियम [४][महाराष्ट्र राज्याच्या मुंबई क्षेत्रास लागू आहे].

**व्याख्या.** **२.** विषयात किंवा संदर्भात एतद्विरुद्ध काही नसल्यास, ह्या अधिनियमांत,—

---

[१] उद्देश व कारणे यांचे निवेदन यांसाठी, मुंबई शासन राजपत्र, १९१८, भाग पाच, इं. पृष्ठे २६६ पहा, आणि परिषदेच्या कार्यपद्धतीसाठी वरील १९१८ चे राजपत्र, भाग पाच, इं. पृष्ठे ८५७ ते ८८९ पहा.

[२] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ च्या अनुसूचीद्वारे अधिनियमाच्या नावामध्ये बदल करण्यात आला.

[३] हे कलम, मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६ अन्वये समाविष्ट करण्यात आले.

[४] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० याअन्वये, "स्थानांतरित प्रदेश वगळून पुनर्रचना-पूर्व मुंबई राज्य" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१][(अ) "परकीय इसम" याचा अर्थ--

(एक) [२] [ भारताचा नागरिक नसेल, ] तो इसम, अथवा

(दोन) जो इसम मग तो मागील व्याख्येत अंतर्भूत होत असो किंवा नसो, खंड (अअ) मध्ये व्याख्या केलेल्या परकीय पेढीचा, अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या सदस्याची निवडणूक होतेवेळी मत देण्याच्या कारणाकरिता किंवा उक्त कोणत्याही प्राधिकरणाच्या कारणाकरिता किंवा त्याच्या सदस्यत्वाकरिता प्रतिनिधी असेल तो इसम;

असा आहे;

(अअ) "परकीय पेढी" या संज्ञेचा अर्थ, कंडिका (अ), उप-कंडिका (१) मध्ये व्याख्या केलेले परकीय लोक जिचे बहुसंख्येने सदस्य आहेत, किंवा जिचा व्यवहार अशा रीतीने व्याख्या केलेल्या परकीयांच्या नियंत्रणाखाली किंवा मुख्यत: त्यांच्या फायद्यासाठीच चालविला जातो अशी कोणतीही पेढी, कंपनी, संघ किंवा व्यक्तींची संस्था (मग ती विधिसंस्थापित असो किंवा नसो) असा समजावा.

[३](ब) * * * * * * *

(क) "सदस्य" या संज्ञेत नगरपालिकेच्या सदस्याचा आणि विश्वस्त संस्थेच्या सदस्याचा समावेश होतो.

**परकीय इसमाची अपात्रता.**

**३.** ह्यात यापुढे अन्यथा जी तरतूद केली असेल ती खेरीजकरून, कोणताही परकीय इसम, अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाचा सदस्य होण्यास किंवा उक्त कोणत्याही प्राधिकरणाच्या सदस्याच्या कोणत्याही निवडणुकीच्या वेळी मत देण्यास पात्र असणार नाही.

**नंतर अपात्र ठरविल्यामुळे होणारे परिणाम.**

**४.** (१) कोणताही इसम, अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही प्राधिकरणाचा सदस्य होऊन त्यानंतर परकीय होईल तर, त्याचे पद त्यानंतर रिकामे होईल.

---

१ मुंबईचा परकीय इसमांच्या अपात्रतेबाबत (सुधारणा) अधिनियम, (१९२० चा मुंबई ४) च्या कलम २ द्वारे मूळ खंड (अ) याऐवजी हे खंड दाखल करण्यात आले.

२ विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे, "ब्रिटिश प्रजाजन नसेल किंवा भारतीय संस्थानचा प्रजाजन नसेल" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३ सन १९२० चा मुंबई अधिनियम, ९ याच्या कलम २ द्वारे खंड (ब) वगळण्यात आला.

(२) [१]मुंबई शहर नगरपालिका अधिनियम, १८८८, कलम १८ हे त्यातील "वर सांगितलेल्या कारणामुळे" ह्या शब्दानंतर, "किंवा [२][महाराष्ट्र परकीय इसमांच्या अपात्रतेबाबत अधिनियम याअन्वये" हे शब्द दाखल करण्यात आल्याप्रमाणे वाचण्यात आले पाहिजे व त्याप्रमाणे त्याचा अर्थ लावण्यात आला पाहिजे. १८८८ चा मुंबई ३.

(३) [१]मुंबई शहर नगरपालिका अधिनियम, १८८८, कलम १५, पोट-कलम (३) हे, त्यातील "कलम" ह्या शब्दानंतर "किंवा [२][महाराष्ट्र परकीय इसमांच्या अपात्रतेबाबत अधिनियम] या अन्वये" हे शब्द दाखल करण्यात आल्याप्रमाणे वाचण्यात आले पाहिजे व त्याप्रमाणे त्याचा अर्थ लावण्यात आला पाहिजे. १९०१ चा मुंबई ३.

**माफी.** **५.** [३][[४][राज्य] सरकारला [५]* * * *] [६][राजपत्रांतील] अधिसूचनेद्वारे, कोणत्याही इसमास किंवा इसमाच्या एखाद्या वर्गास ह्या अधिनियमाच्या कक्षेतून वगळण्याचा अधिकार आहे.

**अनुसूचीतील फेरफार.** **६.** [३][[४][राज्य सरकारला,] [६][राजपत्रातील] अधिसूचनेद्वारे, अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाचे नाव त्यातून काढून टाकावे, किंवा त्यात कोणत्याही इतर स्थानिक प्राधिकरणाचे नाव दाखल करावे असा निदेश देण्याचा अधिकार आहे, आणि त्याप्रमाणे असा निदेश परिणामक्षम असेल.

## अनुसूची

| स्थानिक प्राधिकरण. | | ज्याअन्वये स्थानिक प्राधिकरणाची रचना केली असेल तो अधिनियम. |
|---|---|---|
| मुंबई बंदराचे विश्वस्त | .. | मुंबईचा पोर्ट ट्रस्ट अधिनियम, १८७९ (सन १८७९ चा मुंबई अधिनियम, ६). |
| सर्व स्थानिक मंडळे | .. | [७]मुंबईचा स्थानिक मंडळांबाबत अधिनियम, १८८४ (सन १८८४ चा मुंबई अधिनियम, १). |
| [८]* * * * | | * * * * |

[१] वर उल्लेख केल्याप्रमाणे.

[२] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ च्या अनुसूचीद्वारे अधिनियमाच्या नावामध्ये बदल करण्यात आला.

[३] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश याद्वारे, "गव्हर्नर इन कौन्सिल" या मजकुराऐवजी "प्रांतिक सरकार" हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] विधि अनुकूलन आदेश, १९५० याद्वारे, "प्रांतिक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] प्रक्रांति अधिनियम, १९२० (१९२० चा ३८) चे कलम २ व अनुसूची 'एक' याद्वारे, "गव्हर्नर जनरल इन कौन्सिलच्या मान्यतेने" हा मजकूर निरसित केला.

[६] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश याद्वारे "मुंबई सरकारच्या राजपत्रातील" या मजकुराऐवजी "राजपत्रातील" हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] आता, १९२३ चा मुंबई अधिनियम, ६ पहा.

[८] विधि अनुकूलन आदेश, १९५० याद्वारे, कराची बंदराचे विश्वस्त यासंबंधातील नोंद वगळण्यात आली.

**अनुसूची**--*चालू*

| स्थानिक प्राधिकरण. | ज्याअन्वये स्थानिक प्राधिकरणाची रचना केली असेल तो अधिनियम. |
|---|---|
| मुंबई शहराची महानगरपालिका .. | मुंबईचा शहर नगरपालिका अधिनियम, १८८८ (सन १८८८ चा मुंबई अधिनियम, ३). |
| [१]* * * * | * * * * |
| मुंबई शहर सुधारणा विश्वस्त .. | [२]मुंबईचा शहर सुधारणा अधिनियम, १८९८ (सन १८९८ चा मुंबई अधिनियम, ४). |
| मुंबई शहराबाहेरील नगरपालिका जिल्ह्यांतील सर्व नगरपालिका. | मुंबईचा जिल्हा नगरपालिका अधिनियम, १९०१ (सन १९०१ चा मुंबई अधिनियम, ३). |

[१] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश याद्वारे, एडन बंदराचे विश्वस्त यासंबंधातील नोंद वगळण्यात आली.

[२] मुंबई शहर सुधारणा अधिनियम, १८९८ (१८९८ चा मुंबई ४) हा, सन १९२५ चा मुंबई अधिनियम, १६ याद्वारे निरसित करण्यात आला व सन १९२५ चा मुंबई अधिनियम, १६ हा, सन १९३३ चा मुंबई अधिनियम, १३ याद्वारे निरसित करण्यात आला.

येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-४११ ००६

# महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

- **संचालक**
  शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय,
  महाराष्ट्र राज्य,
  नेताजी सुभाष मार्ग, मुंबई-४०० ००४
  दूरध्वनी : २३६३२६९३     २३६३०६९५

- **व्यवस्थापक**
  शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार,
  फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी. पी. ओ. नजीक.
  पुणे-४११ ००१.
  दूरध्वनी : २६१२५८०८     २६१२४७५९

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार,
  सिव्हील लाईन्स, नागपूर-४४० ००१.
  दूरध्वनी : २५६२६१५     २५६२६१५

- **सहा. संचालक**
  शासकीय लेखनसामग्री भांडार, ग्रंथागार
  पैठण रोड, रेल्वे स्टेशनजवळ,
  औरंगाबाद-४३१ ००१.
  दूरध्वनी : २३३१४६८     २३३१५४५

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
  ताराबाई पार्क,
  कोल्हापूर-४१६ ००३.
  दूरध्वनी : २६५०३९५     २६५०४०२

## महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते